झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा- २/ ५८८ /२०२०
दिनांक :१२/०८/२०२०.

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना )**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव बोपोडी, स.नं.२५ या मिळकतीवरील झोपडपट्टीचे अंदाजे ९९१६.०० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.रेनबो डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२८/०१/२०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्र सक्षम अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२६/०८/१९७३, दि.१६/०१/१९८६ व दि.०३/१२/१९८७ अनुक्र मे पृष्ठ क्र. १७२८, १७५ व २७७१ वर प्रसिध्द अधिसुचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र खाजगी मालकीचे असून या क्षेत्रावरील ७०% झोपडीधारकांनी विकसक मे.रेनबो डेव्हलपर्स यांना योजना राबविणेस संमती दिलेली आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसुचीमधील क्षेत्रापैकी काही क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील दि.११/०९/२०१४ च्या नियमावलीतील नियम क्र.SR-५ (१) अन्वये नमूद केलेल्या तरतुदीनुसार ३ वर्षांच्या प्राधान्य असलेल्या कालावधीत जमीन मालकाने पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल केला नसल्याने सदरचे क्षेत्र संपादित/भूसंपादन करणे आवश्यक आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.एप्रिल ९-१५, २०२० तसेच दैनिक दायित्व आणि विश्वदर्पण वृत्तपत्रात दि.२० मार्च २०२० रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर दि.१५/०५/२०२० रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे. आणि तसेच, उपरोक्त जाहिर करणेत आलेल्या पुर्वसुचनेत हरकती/सुचना मागविणेकरिता नमूद करण्यात आलेला ३० दिवसांचा कालावधी हा कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर दि.१९/०६/२०२० रोजीच्या जाहिर नोटीसअन्वये दि.०६/०७/२०२० पर्यंत वाढविणेत आला होता; आणि

ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / संस्था तसेच सदर क्षेत्राबाबत इतर संबंधितांना प्रत्यक्ष सुनावणी देण्यात आली असुन आक्षेपकास त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आली आहे व त्यांचेकडून प्राप्त झालेले आक्षेप / हरकती / सूचना / दावे आणि पुरावे विचारात घेऊन उचित आदेश पारीत करणेत आले आहेत; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त सर्व आक्षेप/ हरकती/ सूचना/ दावे आणि पुरावे आणि नमुद बाबी विचारात घेऊन, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>अनुसूची</u>

<u>झोपडपट्टीचे नाव</u> : बोपोडी, स.नं.२५

<u>महानगरपालिका क्षेत्र</u> : पुणे महानगरपालिका

| पेठ / गाव / नगररचना योजना | स.नं. / सि.स.नं. / अंतिम भूखंड क्र. | जमिनीची मालकी | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| बोपोडी | स.नं.२५ | खाजगी | ९९१६.०० चौ. मी. | पुर्वेस - ला.स.नं.२४ | |
| | | | | पश्चिमेस - लागू गावठाण | |
| | | | | दक्षिणेस - ला.स.नं.२६ | |
| | | | | उत्तरेस - ला.स.नं.१ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** १२/०८/२०२०

12/8/20

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे
१. जमिन मालक .
२. सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपुप्रा पुणे यांना सुचित करण्यात येते कि या आदेशाच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा.

प्रत -माहिती व उचित कार्यवाहीसाठी
१. मा. जिल्हाधिकारी, पुणे
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना गवनि / झोनिपू विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
३. महापालिका सहाय्यक आयुक्त, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहितीस्तव.
४. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरील आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.
५. विकसक मे.रेनबो डेव्हलपर्स, ऑफिस नं.७०१, प्राईड पर्पल ॲकॉर्ड, महाबळेश्वर हॉटेल जवळ, बाणेर, पुणे-४११०४५.